# संशोधन पध्दती

1) **भाषाशास्त्रीय पध्दती –**

या संशोधन पध्दतीत 1990 नंतरच्या स्त्री लेखिकांच्या भाषा शैलीचा विशिष्ट अभ्यास केला जाणार आहे.

2) **कथनात्मक पध्दती व कथन मिमांसा –**

कथा या साहित्य प्रकाराच्या अनुषंगाने कथेच्या रचनेचे घटक उलघडणे व समजावून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

3) **मानसशास्त्रीय पध्दती –**

या संशोधन पध्दतीत पात्रांचे विश्लेषण करताना मानसशास्त्रीय पध्दतीने स्त्री पात्रांचा विशेष अभ्यास केला जाणार आहे.

# प्रकरण सूची

प्रकरण – 1

मराठी कथा :– स्वरूप – संकल्पना – वाटचाल.

प्रकरण – 2

1990 नंतरचे सामाजिक वास्तव आणि बदलत्या स्त्रीजाणिवा.

प्रकरण – 3

1990 नंतरच्या स्त्रीकेंद्री कथांमधील अनुभवविश्व.

प्रकरण – 4

1990 नंतरच्या स्त्रीकेंद्री कथांमधील स्त्री–पुरूष चित्रण

प्रकरण – 5

1990 नंतरच्या कथांची अभिव्यक्ति व वाङमयीन जाणिवांचे स्वरूप.

प्रकरण – 6

समारोप – निष्कर्ष

# प्रकरण – पहिले

## मराठी कथा – स्वरूप – संकल्पना – वाटचाल

मराठी कथेचा प्रवास एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळातला मानावा लागतो. तिचे स्वरूप बोधवादी व रंजनवादी होते. सुरस व चमत्कारिक हे कथांचे महत्वाचे अंग होते. तर मुलांसाठी नीतिबोध करणारी कथा हे बोधवादी कथांचे वैशिष्टय होते.

समाजवास्तवाचा वेध घेणारी कथा हरिभाऊ आपटे यांच्या स्फूट गोष्टीपासून मराठीत अस्तित्वात आली म्हणून 1890 साली हरिभाऊंनी काढलेल्या 'करमणूक' मधून मराठी लघुकथेची सुरूवात झाली असे म्हटले जाते.

1926 ते 1945 पर्यंतचा काळ हा मराठी कथेच्या उत्कर्षाचा काळ होय. या काळात भरभराटीला आलेल्या 'यशवंत', 'रत्नाकर', 'ज्योत्सना', 'किर्लोस्कर' इ. मासिकांचा हातभार मराठी कथा वाङमयाच्या विकासाला लागला.

फडके कालखंडात मराठी कथा अधिक सुबक व सुघड झाली. फडकेप्रणित कथातंत्राला तांत्रिक किंवा आखीव–रेखीव कथेला य. गो. जोशी यांच्या साध्या सुध्या विस्कळीत आणि जिव्हाळा हे प्रमुख कथातत्व मानणाऱ्या कुटुंबकथेने धक्का दिला.

वाङमयीन संकेताचे जुने साचे नवे वास्तव व्यक्त करण्यास अपुरे आहेत. या जाणिवेतूनच 1940 नंतरच्या दशकात कथेच्या क्षेत्रात गंगाधर गाडगीळांनी नवतेचे प्रवर्तन घडवले.

नवकथेच्या उदयाचा काळ हा संक्रमण काळ होता. 1960 नंतर मराठी कथाविश्व इतके विस्तारले की, या विस्तारित विश्वात ग्रामीण, दलित, स्त्रीकेंद्री, अस्तित्ववादी, नागर असे विविध प्रवाह ठळकपणे द्वकगोचर झाले.

कौटुंबिक भावसंबंधाचा शोध घेतानाच माणसाच्या एकटेपणाची जाणीव व्यक्त करणारी आनंद विनायक जातेगावकरांची कथा साठोत्तर कालखंडाच्या पहिल्या दशकातील महत्वाची कथा आहे. साठोत्तरी मराठी कथांची वैशिष्टये समजून घेतल्यानंतर काळाच्या या टप्प्यावर द्वकगोचर होणारे विविध प्रवाह समजून घ्यावयाचे आहेत.

**<u>ग्रामीण कथा</u> :**

ग्रामीण कथेच्या पातळीवर नवता प्रस्थापित करणाऱ्या व्यंकटेश माडगुळकरांच्या आगेमागे लेखन करू लागलेल्या कथाकारांमध्ये शंकर पाटील, द. मा. मिरासदार, उध्दव शेळके यांचा प्रामुख्याने समावेश होतो. उध्दव शेळक यांची कथा विदर्भातील ग्रामीण भागातल्या तळागाळातील माणसांचे चित्रण करते. 1975 नंतरच्या ग्रामीण कथेच्या संदर्भात बाबाराव मुसळे, भास्कर चंदनशिव, प्रतिमा इंगोले, उत्तम बावस्कर, राजन गवस इ. कथाकारांची नावे उल्लेखनीय ठरतात.

**<u>दलित कथा</u> :**

प्रस्थापित समाजाच्या रूढीबध्द चाकोरीला आणि शोषणाला आव्हान देणारा, त्यांच्या अभिव्यक्तिच्या स्वघोषित मक्तेदारीला मोडून काढणारा विद्रोही दलित लेखक वर्ग साठोत्तर कालखंडात वेगाने पुढे आला.

**<u>स्त्रियांची कथा</u> :**

स्त्रियांचे अनुभवविश्व प्रकट करणारी स्त्रियांची कथा हा साठोत्तर कालखंडातील एक सशक्त प्रवाह. 1950–60 च्या दरम्यान आणि पुढेही लेखन करणाऱ्या लेखिकांच्या फळीत कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, ज्योत्सना देवधर ही उल्लेखनीय नावे आहेत.

1975 नंतर स्त्रीवादी विचारसणीचा फार मोठा प्रभाव स्त्रियांच्या साहित्यावर पडला. आणि स्त्रियांची कथा विविधांगी झाली.

नागरकथा :

1945 च्या सुमारास नागर संवेदनशीलतेचे चित्रण करणारी गंगाधर गाडगीळांची कथा हा मराठी कथेचा प्रभावी आविष्कार होता. दिलीप चित्रे, भाऊ पाध्ये, अनिल डांगे, रंगनाथ पाठारे, कमल देसाई हे या नागरकथा प्रवाहाला सशक्त करणारे प्रमुख कथाकार.

गेल्या दोन दशकांचा कालखंड हा सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्टया भारतीय समाजाचा पोत आमुलाग्र बदलून टाकणारा कालखंड आहे. विविध प्रकारे या काळाची स्पंदने टिपण्याचा प्रयत्न कथाकारांनी केला आहे. विविध स्तरावरील हिंसा व दहशतवाद, मानवी प्रेरणांमधील ताणतणाव, स्त्री–पुरूष संबंधाचे बदलते पैलू असे विविध विषय आजच्या मराठी कथेत दिसतात.

# <u>प्रकरण – दुसरे</u>

**1990 नंतरचे सामाजिक वास्तव आणि बदलत्या स्त्रीजाणिवा.**

इ.स. 1990 नंतर जागतिकीकरणाच्या पर्वाला सुरूवात झाली. जागतिकीकरण हे माणसाचे स्थलांतर, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भांडवलाच्या गतिमान हालचाली व भांडवली बाजारपेठेचे एकत्रीकरण यावर अवलंबून असते. जगातल्या विविध देशांचे वाढते आर्थिक परावलंबन हे जागतिकीकरणाचे मुख्य लक्षण आहे.

जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या समस्यांचा गरीब, आणि शोषित वर्गाशी थेट संबंध आहे. किंबहुना शोषितांचा, गरिबांचा, श्रमीकांचा, समाजाच्या तळाशी असणारा हा वर्गच जागतिकीकरणाने अधिक होरपळाला जात आहे. स्त्रियांचा समावेश याच वर्गात होतो. त्यामुळे शोषणाचे सर्वंकष नवे मार्ग निर्माण झाले. स्त्री एक वस्तू आहे. उपभोग वस्तू म्हणून स्त्रीचा वापर केला जाऊ लागला. जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या वेगवेगळया साधनांच्या मदतीने स्त्रीचे शारीरिक, मानसिक, लैंगिक, भावनिक आर्थिक शोषण केले जाऊ लागले.

जागतिकीकरणाने स्त्रियांसाठी नवनव्या संधी निर्माण केल्या. या संधीने स्त्रियांचे जीवन बदलून टाकले. काही मोजक्या उच्च शिक्षित स्त्रियांच्या हातात प्रचंड पैसा आला. त्याचे परिणाम समाज, कुटुंब, व्यक्तिवर झाले. स्त्री सौंदर्याचे बाजारीमूल्य वाढले. श्रीमंत वर्गाकडून निम्न स्तरातील स्त्रियांचे वेगवेगळया पध्दतीने शोषण केले जाऊ लागले. या सर्व परिस्थितीचे चित्रण इ.स. 1990 नंतर स्त्रियांच्या कथेतून येऊ लागले.

प्रसार माध्यमांनी स्त्रियांच्या बाबतीत कायमच दुय्यम भूमिका घेतली. पारंपरिक व्यवस्थेने लादलेल्या अनेक गोष्टी स्वीकारण्याशिवाय इतर दुसरा कोणताही पर्याय स्त्रियांसाठी शिल्लक नसतो.

अनुराधा पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे ''यापेक्षा चांगले जग कोठून आणायचे''? हा प्रश्न स्त्रियांपुढे नेहमीच उभा राहतो. यातून येणारी हतबलता मराठीतील काही लेखिकांनी चांगल्या प्रकारे मांडली आहे. तरी स्त्रीच्या माणूसपणाची लढाई अजूनही पूर्ण झालेली नाही. अनेक नव्या आव्हानांची मालिका स्त्रियांपुढे उभी आहे आणि या सर्व समस्यांचे आव्हानांचे चित्रण स्त्री लिखित साहित्यात अपेक्षित आहे.

# प्रकरण – तिसरे

**1990 नंतरच्या स्त्रीकेंद्री कथांमधील अनुभवविश्व.**

स्त्रीवादी चळवळ ही स्त्रियांना मानवी हक्क मिळवून देणारी चळवळ आहे. परंतु आज देखील ज्याविरूध्द चळवळ उभारावी असे अनेक प्रश्न स्त्री जीवनात अस्तित्वात आहेत. स्त्रीभृणहत्या, आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहाला होणारा सामाजिक विरोध आणि त्यातून स्त्रियांचा घेतला जाणारा बळी यातून होणारा सामाजिक प्रक्षोभ, हुंडाबळी, पिडीत मुस्लीम स्त्रियांचे प्रश्न, बलात्कारित स्त्रियांची वेदना, दलित आदिवासी स्त्रियांचे प्रश्न, वेश्यांचे प्रश्न, नोकरी व्यवसायातील स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम आणि अपमानीत वागणूक, त्यांचे लैगिक शोषण, अराजकता, हिंसाचार यामुळे स्त्रियांचे होणारे शोषण, मंडल आयोग, जागतिक अर्थकारणातील घडामोडी, भांडवलशाही आणि गरिबी यांच्यातील संघर्ष असे अनेक प्रश्न नवे रूप घेऊन समोर आले.

गुजरातमधील हत्याकांड, जमाववाद, वर्चस्ववाद आणि मूलतत्ववाद या सर्वच प्रश्नांचे स्त्री जीवनावर विघातक परिणाम झाले.

1990 नंतरच्या स्त्रीकेंद्री कथांमध्ये या सर्व प्रश्नांचा विचार दिसून येतो.

# प्रकरण – चवथे

## 1990 नंतरच्या स्त्रीकेंद्री कथांमधील स्त्री–पुरूष चित्रण.

स्त्रियाचें अनुभविश्व प्रकट करणारी स्त्रियांची कथा हा एक सशक्त प्रवाह. लेखिकांच्या फळीत कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, ज्योत्सना देवधर, ही उल्लेखनीय नावे आहेत. त्यानंतरच्या निर्मला देशपांडे, तारा वनारसे, गिरिजा कीर इत्यादी लेखिकांनी हा वारसा समृध्द केला. त्यांचे लेखन प्रामुख्याने स्त्रीकेंद्री व स्त्रीला येऊ लागलेल्या सजग आत्मभानाचे चित्रण करणारे असले तरी ते प्रस्थापित पुरुषप्रधान संस्कृतीचा निषेध करणारे नव्हते.

1975 नंतर महाराष्ट्रात जोमाने उभ्या राहिलेल्या स्त्रीमुक्ती चळवळीचा तसेच स्त्रीवादी विचारसरणीचा फार मोठा प्रभाव स्त्रियांच्या साहित्यावर पडला. या कालखंडात व त्यानंतर कथालेखन करणाऱ्या लेखिकांची कथा पुरूषप्रधान समाज व्यवस्थेतील स्त्रीच्या घुसमटीचे चित्रण करतानाच स्त्री–पुरूष नात्यातील गुंतागुंतीचा अर्थपूर्ण शोध घेते. थेट स्त्रीवादी जाणिवांच्या अंगाने न जाता, स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेणारी, माणूस म्हणून जगणाऱ्या मुक्त स्त्रीची प्रतिमा साकारणारी, स्त्रीच्या आत्मसामर्थ्याचा वेध घेणारी, पुरूषप्रधान संकेताची चौकट नाकारून धीटपणे व्यक्त होणारी हे या कथेचे निवडक ठळक आविष्कार आहेत.

सामाजिक मानसिक प्रश्नांची चांगली जाण या कथालेखिकांना आहे. स्त्री शरीर विशिष्ट अनुभवांमधून स्त्रीचे शरीर–मन यांच्याकडे बघण्याचा नीति निरपेक्ष दृष्टिकोन त्यांच्या कथांमधून व्यक्त झाला आहे.

अनुभवार्थ, कथानक, पात्र, घटना–प्रसंग, निवेदन, स्थलकालबध्द वातावरण आणि भाषा हे कथासमष्टीचे घटक असून त्यांचे एकमेकांशी सेंद्रिय नाते असते. कथा हा स्फूट साहित्यप्रकार असला तरी संपन्न जीवनानुभव आणि कलानुभव देण्याचे सामर्थ्य कथेत असते.

# <u>प्रकरण – पाचवे</u>

**1990 नंतरच्या कथांची अभिव्यक्ती व वाङमयीन जाणिवांचे स्वरूप.**

गेल्या पंचवीस वर्षातील मराठी कथा प्रवाहाचा काळ पाहता कथेच्या क्षेत्रात निरनिराळे प्रयोग झाले. वाङमयप्रकाराची प्रसरणशीलता कमाल मर्यादेपर्यंत ताणली गेली. कथानक असलेली, कथानक नसलेली, लहान, मोठी, पत्रात्मक, आत्मनिवेदनात्मक, एकाच पात्राभोवती फिरणारी, अनेक पात्रे असलेली, गद्यात्मक, पद्यात्मक अशा अनेक पध्दतीने कथांची अभिव्यक्ति होत आहे.

कथांच्या क्षेत्रात विविध प्रवाह निर्माण झाले असले तरी कथेचा मुख्य प्रवाह 'मनोविश्लेषक कुटुंबकथाच' आहे. यातील मनोविश्लेषण हे लेखिकांच्या चिंतनातून आलेले आहे. भावुक, भावनाविवश, नेमका परिणाम नसणाऱ्या, खोटया काव्यात्म कथांना यात स्थान नाही. अस्तित्ववादाच्या, स्त्रीवादाच्या पध्दतीने फार काळ कथा जात नाही. समन्वयवादाच्या भूमिकेतून मुख्य प्रवाहाकडे येते.

केवळ मनोरंजनासाठी या काळातील कथा लिहिल्या गेल्या नाहीत. त्यात कलात्मकतेचा प्रयत्न आहे. घटनांचे, पात्रांचे चित्रण भडक, बटबटीत व उथळ आणि साचेबंद नाही.

# प्रकरण – सहावे

## समारोप – निष्कर्ष

1990 नंतर आपल्याभोवतीच्या एकूण जगण्याला प्रचंड वेग आला आहे. जागतिकिकरणाच्या झंझावाताने अवघे जगणेच ढवळून काढले आहे. व्यक्ती म्हणून असणारा माणसाचा स्व विशिष्ट चेहरा या उलथापालथीत हरवतो आहे. व्यक्तीचे रूपांतर ग्राहकात होते आहे आणि दुसरीकडे सामाजिक जीवनाला बसत असलेले हादरे आपली सांस्कृतिक मुळेच उखडत आहेत. आपल्या समकालीन भोवतालाची ही पडझड, मूल्यांचे पतन, सामाजिक व वैयक्तिक जीवनातील विसंगती आपल्या अनुभवात पकडू पाहणाऱ्या लेखकाचे झगडणे अटळ आहे. हे झगडणे परिस्थितीशी व स्वतःशी तर आहेच पण ते अभिव्यक्तीच्या जुन्या रूपांशी देखील आहे. साहित्यसौंदर्याच्या प्रस्थापित संकेताशी आहे आणि समाजाच्या चौकटीत घडत गेलेल्या भाषेशी देखील आहे. म्हणूनच आजच्या काळाचे गुंतागुंतीचे आणि सातत्याने बदलत जाणारे वास्तव लक्षात घेता कथनात्मक वाङमयाचा आशय आणि रूपबंध यांच्यात अनेक अंगांनी बदल होणे अपरिहार्य आहे.

1990 नंतर जागतिकीकरण खाजगीकरणामुळे अनेक नवे प्रश्न निर्माण झाले. तीव्र झालेल्या स्पर्धेत मानवी मूल्यांची प्रचंड हानी झाली. भांडवलशाही व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान अधिक खालावले. प्रसारमाध्यमानी स्त्रियांच्या बाबतीत कायमच दुय्यम भूमिका घेतली. या प्रश्नांचे विवेचन मराठी स्त्री लिखित साहित्यात फारसे झालेले दिसत नाही. स्त्रियांच्या प्रश्नांचा बराच अवकाश अजून स्त्रीवादी लेखिकांना व्यापायचा आहे.